मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प./न.प./ज.प./ माहितीचा अधिकार
आवक क्र... ८४/२०१८-१९
दिनांक:- ११/१०/२०१८ **Annexure - A**

# Application under section 6 (1) of the Right to Information Act, 2005

**(See Rule 3)**

10 रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 भारत INDIA 2018 दस रुपये TEN RUPEES

To
**Public Information Officer**
Municipal Secretary,
Mira Bhayandar
Municipal Corp.

1. **Full Name of applicant**:-Krishna C. Gupta (Satyakaam Foundation)
2. **Address**:-S-106, Patadiya Complex, JanardanRakviMarg, Uttan Road, Bhayandar (W), District. Thane – 401101.Mob.: **+91 8424823262**, Email.: kcgupta.1997@gmail.com
3. **Time period to which the information relates**:- From Aug/2017 till the date of reply to this RTI application.
4. **Subject matter of information**:- Questions raised by Corporators in the House of MBMC till date.
5. **Description of Information required**:-
   i. furnish me the copy of questions raised by all Corporators in MBMC from Aug'2017 till date.
   ii.
   iii.
   iv.
6. **The information is required by**:- Registered/Speed Post. प्रत्यक्ष ... ₹10/-

**Dear P.I.O., Please note:-**

- If you find any query with above mentioned points, you can Call or E-mail me.
- If possible kindly provide me the information in electronic form on my E-mail, [Sec. 2 (f) (j)]
- If any information sought is available with any other department, then kindly transfer the copy of concerned query to that department (within a period of 05 day's) and promptly inform me in writing, giving details of the dept. to which it is transferred. [see Sec.6 (3)]

Date:- 8 /10 /2018
Place:- Bhayandar.

Signature of applicant,
8/10/18
Krishna C. Gupta.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग


जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./६४/2018 दिनांक :-२४/१० /2018

प्रति,
**श्री. कृष्णा सी. गुप्ता**
**सत्यकाम फाऊंडेशन,**
**एस-106, पटाडिया कॉम्पलेक्स,**
**जनार्दन रकवी मार्ग, उत्तन रोड,**
**भाईंदर (प.)**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**महापालिका सभागृहात मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची प्रत मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 8/10/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण, माहे ऑगस्ट 2017 पासुन मा. महासभेकरिता सन्मा. नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत माहितीची मागणी केलेली आहे. नगरसचिव विभागातील अभिलेख्याची पडताळणी केली असता सन्मा. नगरसेवकांकडून दि. 01/11/2017 रोजी मा. महासभेकरिता पहिला प्रश्न विचारण्यात आलेला असल्याची नोंद दिसुन येत आहे. त्यानुसार दि. 01/11/2017 पासुन मा. महासभेकरिता सन्मा. नगरसेवकांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची यादी सोबत जोडून आपणांस उपलब्ध करुन देत आहोत. (एकुण पाने 04)

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.


**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**


pc 2\\Pranali\d\Mahiti Adhikar\Letter - Krishna Gupta.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभेकरिता सन्मा. नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नाची यादी

| प्रश्न |
|---|
| **१. सौ. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. ०१/११/२०१७ रोजी विचारलेला प्रश्न.** |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत सुरु असलेल्या भुयारी गटार योजना, काँक्रीट रस्त्याचे कामे, बी.एस.यु.पी. प्रकल्प, उत्तन घनकचरा प्रकल्प मागील एक वर्षापासून जवळजवळ बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय? |
| अ) सदर प्रकल्प बंद पडण्याची कारणे काय आहेत? |
| ब) सदर प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रशासनामार्फत कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत अथवा येणार आहेत? |
| **२. सौ. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. ०१/११/२०१७ रोजी विचारलेला प्रश्न.** |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मागील ५ वर्षापासून मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झालेली असून प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत अनधिकृत बांधकामांच्या माहितीबाबत नियमानुसार ठेवण्यात येणारी नोंदवही ठेवण्यात आली आहे काय? |
| अ) सदर नोंदवहीचा नमुना महाराष्ट्र लेखा संहितानुसार अथवा कोणत्या कायद्यानुसार ठेवण्यात येतो? |
| ब) मागील ५ वर्षात आढळून आलेल्या प्रभागनिहाय अनधिकृत बांधकामांची यादी, सदर बांधकामांना देण्यात आलेल्या नोटीसीची माहिती, बांधकामांवर केलेली कारवाई, न्यायालयीन स्थगीती, लेखी कथन याबाबतची माहिती मा. महासभेसमोर उपलब्ध करुन देण्यात यावी. |
| क) पदनिर्देशित अधिकारी यांच्यावर अनधिकृत बांधकामाबाबत कोणत्या कायद्यानुसार व कोणती कारवाई होऊ शकते? याबाबता तपशिल आजपर्यंत नदनिर्देशित अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईचा तपशिल देण्यात यावा. |
| **३. सौ. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. १०/११/२०१७ रोजी विचारलेला प्रश्न.** |
| १) सन २०११ पासून मा. न्यायालयात दावा दाखल केलेल्या प्रकरणांवर सद्यस्थितीत काय कार्यवाही प्रस्तावित आहेत? |
| अ) ज्या प्रकरणांमध्ये न्यायालयाची स्थगिती समाप्त झाली आहे अशा किती व कोणत्या प्रकरणांवर कारवाई करण्याबाबत प्रभाग अधिकारी व विभागप्रमुख यांना दिलेल्या पत्रांची छायांकित प्रत देण्यात यावी व आकडेवारी नमुद करावी. |
| ब) सन २०११ पासून आतापर्यंत मनपा विरोधात निकाल लागलेल्या प्रकरणांमधील किती व कोणकोणत्या प्रकरणांमध्ये अपील करण्यात आले व कोणत्या प्रकरणात अपील केले नाही याची माहिती देण्यात यावी. |
| क) सन २०११ पासून मा. न्यायालयात घेतलेली स्थगीती किती प्रकरणांवर त्वरीत उठविण्यात आली? |
| ड) पदनिर्देशित अधिकारी यांच्यावर कामचूकार, कामामध्ये दिरंगाई व हलगर्जीपणा किंवा विरोधकांना मदत केल्यास कोणत्या कायद्यानुसार कोणती कारवाई होऊ शकते? |
| **४. सौ. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. १०/११/२०१७ रोजी विचारलेला प्रश्न.** |
| १) मिरा भाईंदर मनपा क्षेत्राचे सिटी सर्व्हे करण्याचे काम सुरु करण्यात आले होते, हे खरे आहे काय? असल्यास सदर काम पूर्ण झाले आहे का? व नसल्यास सदर काम अर्धवट स्थितीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय? |
| अ) शासनाच्या जमावबंदी आयुक्तांमार्फत मनपाने केलेले सिटी सर्व्हेचे काम तपासून अंतिम करण्यासाठी सक्षम अधिकारी नेमण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय? |
| ब) सदर विलंबाची कारणे व शासनामार्फत करावयाच्या उपाययोजना व सदर काम कधीपर्यंत पूर्ण होणार? |
| **५. श्री. जुबेर इनामदार मा. सदस्या यांनी दि. ३०/११/२०१७ रोजी विचारलेला प्रश्न.** |
| १) मा. महासभा दि. 30/07/2010 प्रकरण क्र. 26 ठराव क्र. 32 1966 चे कलम 37 अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करण्याचा विषय मंजुरीसाठी शासन दरबारी पाठविला होता त्या वर शासनाने काय कारवाई केली आहे ? |
| अ) तत्कालीन आयुक्त शिवमुर्ती नाईक साहेबांनी दि. 22/02/2011 रोजी जावक क्र.मनपा / सा.बा./8830/2010- |

| |
|---|
| 11 अन्वये श्री. जयेश शहा (रवि डेव्हलपर्स) यांना सिमेंट कॉक्रीटचे रस्ते विकसीत करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीच्या कोणत्यो नियमांना अधिन राहुन कार्यादेश दिले ? |
| ब) मिभामनपा सार्वजनिक बांधकाम विभागाने वरील विषया ह्यांचे दिनांक 24/09/2014 रोजी विधी विभागाला अभिप्रायसाठी पत्र सादर केले. त्याला अनुसरुन विधी विभागाच्या अभिप्राय वर मनपाने काय निर्णय घेतला ? |
| क) मे. रवि डेव्हलपर्स (श्री. जयेश टी. शहा) व इतर सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. 158/2, 159, 156/2, 154/2, 152/2, 81/1,2,3/पै, 5,6, 85/1, 27/1, 10अ, 28/5, 29/3, 27/2, 72/2, 73/1,2,3,4 74/1,2, 75/1, 79/1,2,3 4,88/1/1, 89/1,3, 225/पार्ट, 435, 436, 437/1 ते 3,5 ते 11, 438/1 ते 3,5 439/1पै, 6,8, 40/1,2,3 ते 8,11,12,13, 444/5, 443/1पै, 443/2पै, 418/3,4 444/1,3, 418/2, 409/3, 396/7 मौजे मिरा/ घोडबंदर/ नवघर हे जमीन मालक आहेत, पट्टाधारक किंवा अधिका पत्रधारक आहे. |
| ड) मे. रवि डेव्हलपर्स यांनी मनपाचे ठरवुन दिलेल्या सिमेंट कॉक्रीट रस्ते विकसीत करण्यासाठी दिलेल्या कार्यादेशातील तपशीला नुसार नसल्याचे व केलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याने WAPCOS लि. यांने दि. 04/01/2013 रोजीच्या पत्रान्वये मनपाला सुचित केले. तसेच मा. उच्च न्यायालयात दाखल याचिका क्र. 5509 /2012 मे. रवि डेव्हलपर्स केलेले काम हे निकृष्ट दर्जाचे असल्याने प्रतिज्ञापत्राद्वारे मनपा शहर अभियंता यांनीही सादर केले आहे. |
| इ) मे. रवि डेव्हलपर्स ह्यांनी मनपाचे त्रयस्थ पक्ष WAPCOS लि. ह्यांनी सादर केलेल्या अहवालाला चुकीचे ठरविणारे अन्य त्रयस्थ पक्ष यांचा तांत्रिक अहवाल सादर करुन सिमेंट कॉक्रीटचे रस्ते विकसीत करण्याचे मोबदला म्हणुन विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची मागणी केली. असे असता, चुकीचा अहवाल सादर करणाऱ्या त्रयस्थ पक्ष WAPCOS लि. ह्यांना मनपा प्रशासनाने काळया यादीत का टाकले नाही |
| ई) मिरा भाईंदर महानगरपालिकेने मे. रवि डेव्हलपर्स पार्टनर (श्री. जयेश टी. शहा) यांना प्रदान केलेले विकास हक्क प्रमाणपत्र क्र. 517/2015 व 530/2016 प्राप्त केल्यानंतर त्याने त्यांची किती अनधिकृत बांधकाम अधिकृत करुन घेतली आहेत? |
| **६. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. १७/०२/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न.** |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे लावण्यात येत असलेल्या विशेष स्वच्छता कर. |
| अ) मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे कधी विशेष स्वच्छता कर लावण्यात आला? |
| ब) त्यानंतर प्रत्येक वर्षी किती स्वच्छता कर लावण्यात आला? |
| क) विशेष स्वच्छता कर कुठे खर्च करण्यात आला? |
| २) मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे चालविणेत येत असलेल्या परिवहन सेवेबाबत. |
| अ) पालिकेचा अर्थसंकल्प २०१७-१८ यासाठी किती तरतुद होती? |
| ब) पालिकेने किती खर्च केला? |
| क) किती बसेस पालिकेला मंजूर झाल्या? |
| ड) किती बसेस सध्या चालु आहेत? |
| ३) मिरा भाईंदर महानगरपालिका विधी विभाग |
| अ) पालिकेच्या पॅनेलवर किती व कोणते वकील आहेत? |
| ब) पालिकेने सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८ (आजपर्यंत) किती खर्च केला? |
| क) पालिकेचे वकील कोणकोणते खटले लढले व किती व कोणत्या खटल्यांमध्ये पालिकेच्या बाजुने निकाल लागले? |
| ड) पालिकेचे वकील कोणकोणते खटले लढले व किती व कोणत्या खटल्यांमध्ये पालिकेच्या विरोधात निकाल लागले? |
| ४) मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभाग |
| अ) या विभागाचे प्रमुख कोण आहेत? |
| ब) या विभागातर्फे कोणकोणती कामे केली जातात? |
| क) पालिकेचे सांकेतिक स्थळ कोणते व ते अपडेट आहे का? |
| ड) या स्थळावर कोणकोणती माहिती दिली जाते? |
| इ) पालिकेचे सांकेतिक स्थळ अपडेट नसेल तर याला जबाबदार कोण? त्याच्यावर कोणती कार्यवाही अपेक्षित |

| |
|---|
| आहे? |
| ई) पालिकेने आतापर्यंत या विभागावर कारवाई केली आहे का? असल्यास कोणती? |
| **७. सौ. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. १२/०३/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न.** |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मागील ५ वर्षापासून मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झालेली असून प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत अनधिकृत बांधकामांच्या माहितीबाबत नियमानुसार ठेवण्यात येणारी नोंदवही ठेवण्यात आली आहे काय? |
| अ) सदर नोंदवहीचा नमुना महाराष्ट्र लेखा संहितानुसार अथवा कोणत्या कायद्यानुसार ठेवण्यात येतो? |
| ब) मागील ५ वर्षात आढळून आलेल्या प्रभागनिहाय अनधिकृत बांधकामांची यादी, सदर बांधकामांना देण्यात आलेल्या नोटीसीची माहिती, बांधकामांवर केलेली कारवाई, न्यायालयीन स्थगीती, लेखी कथन याबाबतची माहिती मा. महासभेसमोर उपलब्ध करुन देण्यात यावी. |
| क) पदनिर्देशित अधिकारी यांच्यावर अनधिकृत बांधकामाबाबत कोणत्या कायद्यानुसार व कोणती कारवाई होऊ शकते? याबाबता तपशिल आजपर्यंत नदनिर्देशित अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईचा तपशिल देण्यात यावा. |
| **८. सौ. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. १२/०३/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न.** |
| १) सन २०११ पासून मा. न्यायालयात दावा दाखल केलेल्या प्रकरणांवर सद्यस्थितीत काय कार्यवाही प्रस्तावित आहेत? |
| अ) ज्या प्रकरणांमध्ये न्यायालयाची स्थगिती समाप्त झाली आहे अशा किती व कोणत्या प्रकरणांवर कारवाई करण्याबाबत प्रभाग अधिकारी व विभागप्रमुख यांना दिलेल्या पत्रांची छायांकित प्रत देण्यात यावी व आकडेवारी नमुद करावी. |
| ब) सन २०११ पासून आतापर्यंत मनपा विरोधात निकाल लागलेल्या प्रकरणांमधील किती व कोणकोणत्या प्रकरणांमध्ये अपील करण्यात आले व कोणत्या प्रकरणात अपील केले नाही याची माहिती देण्यात यावी. |
| क) सन २०११ पासून मा. न्यायालयात घेतलेली स्थगीती किती प्रकरणांवर त्वरीत उठविण्यात आली? |
| ड) पदनिर्देशित अधिकारी यांच्यावर कामचूकार, कामामध्ये दिरंगाई व हलगर्जीपणा किंवा विरोधकांना मदत केल्यास कोणत्या कायद्यानुसार कोणती कारवाई होऊ शकते? |
| **९. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. १४/०३/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न.** |
| १) मनपा क्षेत्रात किती ठिकाणी बाजार फी वसुल केली जाते? |
| अ) सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८ किती अंदाजित रक्कम मनपा अर्थसंकल्पामध्ये दाखविण्यात आली होती? त्यातील वर्षनिहाय किती वसुल झाली? |
| ब) या प्रत्येक ठिकाणचे सन २०१७-१८ चे ठेकेदार कोण आहेत? |
| क) सन २०१७-१८ साठी प्रत्येक बाजारासाठी किती बँक गॅरंटी ठरविण्यात आली होती व कोणी किती जमा केली? |
| ड) मनपाला मार्च २०१७ अखेर निविदेत ठरविल्याप्रमाणे किती बाजार फी शुल्क येणे आहे व कोणाकडून? |
| इ) मार्च २०१७ अखेर पर्यंत डिफॉल्डर ठेकेकदार कोण आहेत व मनपाने त्यांच्यावर कोणती कारवाई केली? |
| **१०. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. २३/०३/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न.** |
| १) मनपा हद्दीत किती संकुलांना म्हाडा योजने अंतर्गत परवानगी देण्यात आलेली आहे. |
| अ) मनपा हद्दीत कोणत्या संकुलांना म्हाडा योजने अंतर्गत परवानगी देण्यात आलेली आहे. |
| ब) मनपा म्हाडा योजने अंतर्गत किती घनफुट बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. |
| क) मनपाकडे म्हाडा योजने अंतर्गत किती शुल्क मनपाकडे जमा झालेले आहे? दिनांका प्रमाणे व नावाप्रमाणे माहिती द्यावी. |
| ड) मनपाकडे म्हाडा योजने अंतर्गत किती घरकुले प्राप्त झालेली आहेत. |
| इ) म्हाडा योजने अंतर्गत अजूनपर्यंत कोणत्या सोयीसुविधा MMRDA ने महापालिकेला पुरविलेल्या आहेत. |
| ई) म्हाडा योजने अंतर्गत किती व कोणत्या विकासकाचे व किती घनफुट क्षेत्रफळाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. |
| उ) म्हाडा योजने अंतर्गत विकासकाला किती FSI देण्यात येतो. |
| **११. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. २३/०३/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न.** |
| १) मनपा क्षेत्रातील किती शाळांना मालमत्ता करात सवलत देण्यात येते. |
| अ) मनपा क्षेत्रातील कोणत्या शाळांना मालमत्ता करात सवलत देण्यात येते. |

| |
|---|
| ब) सन २०१६-१७ व २०१७-१८ आर्थिक वर्षात मनपा क्षेत्रातील कोणत्या शाळांना प्रत्येकी किती रक्कमेची मालमत्ता करात सवलत देण्यात आली. |
| क) सन २०१६-१७ व २०१७-१८ आर्थिक वर्षात मनपा क्षेत्रातील कोणत्या शाळांना प्रत्येकी किती दारिद्र्य रेषेखालील मुलांना शाळेत प्रवेश दिले व मा. महासभेतील ठरावास अनुसरुन कार्यवाही केली. |
| ड) मा. महासभेतील ठरावातील अटीशर्तींचे पालन न करणाऱ्या व करसवलत घेणाऱ्या मनपा क्षेत्रातील शाळांवर अजुनपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली. |
| इ) मनपा क्षेत्रातील कोणत्या शाळांचे प्रस्ताव मालमत्ता करात सवलतीसाठी प्रलंबित आहेत. |
| **१२. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. २३/०३/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न.** |
| १) मनपा हद्दीत किती संकुलांना MMRDA RENTAL SCHEME अंतर्गत परवानगी देण्यात आलेली आहेत. |
| अ) मनपा हद्दीत कोणत्या संकुलांना MMRDA RENTAL SCHEME अंतर्गत परवानगी देण्यात आलेली आहेत. |
| ब) मनपा MMRDA RENTAL SCHEME अंतर्गत किती घनफुट बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. |
| क) मनपाकडे MMRDA RENTAL SCHEME अंतर्गत किती शुल्क मनपाकडे जमा झालेले आहे? दिनांका प्रमाणे व नावाप्रमाणे माहिती द्यावी. |
| ड) मनपाकडे MMRDA RENTAL SCHEME अंतर्गत किती घरकुले प्राप्त झालेली आहेत. |
| इ) MMRDA RENTAL SCHEME अंतर्गत अजूनपर्यंत कोणत्या सोयीसुविधा MMRDA ने महापालिकेला पुरविलेल्या आहेत. |
| ई) MMRDA RENTAL SCHEME अंतर्गत किती व कोणत्या विकासकाचे व किती घनफुट क्षेत्रफळाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. |
| उ) MMRDA RENTAL SCHEME अंतर्गत विकासकाला किती FSI देण्यात येतो. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका